## नि. ५ खालील आदेश

सदर अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ सह कलम १५१ अन्वये प्रतिवादीविरुद्ध तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरिता केलेला आहे.

२. वादपत्र, लेखी कैफियत, सदर अर्ज तसेच त्यावरील उत्तर वाचले. वादीतर्फे वकील श्री. काळे आहे. व प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे वकील श्री. आखाडे तसेच प्रतिवादी क्र. ३ ते ५ तर्फे वकील श्री. वानखेडे यांचे म्हणणे ऐकण्यात आले. तसेच दाव्यामध्ये दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

३. वादीने मनाई अर्जात असे कथन केलेले आहे की, मौजे शहापुर ता. मेहकर येथील शेतजमीन गट नंबर २३ पैकी हिस्सा १/४ व गट नंबर २० पैकी हिस्सा १/४ हया जमीनी दावा मिळकत आहेत. वादी व प्रतिवादी हिन्दु मिताक्षरा कायद्याप्रमाणे एकत्र कुटूंबातील सदस्य आहे. प्रतिवादी १ व २ हे वादीचे आई व भाउ आहे. प्रतिवादी ३ ही वादीचे मयत भाउ कैलास हयाची विधवा पत्नी आहे. प्रतिवादी ४ व ५ हे प्रतिवादी ३ चे मुले आहेत. दावा मिळकत वादी व प्रतिवादींची वडीलोपार्जित मालमत्ता आहे. वादीचे वडीलांना सदरची मिळकत त्यांचे आई वडीलांकडून वारसा हक्काने मिळालेली आहे. सुरुवातीला दावा मिळकत ही वादीचे वडील मयत नामदेव सहादु मापारी यांना वंशपरांपरागत पध्दतीने मिळालेली होती. त्यांच्या मृत्युनंतर प्रतिवादी २ व प्रतिवादी ४ हयांनी वाद मिळकत आपसात वाटणी करुन घेवून तशी शासन दप्तरी नोंदी करुन घेतल्या. वादीचा दावा जमीनीत १/४ हिस्सा असतांना देखील तिचा हिस्सा डावलुन प्रतिवादी २ व ४ यांनी त्यांच्यामध्ये स्वत:च्या स्वार्थापोटी वाटण्या करुन घेतल्या. वादीचा मयत भाउ कैलास वारल्यानंतर प्रतिवादी ३ ते ५ हे मौजे कळपविहीर येथे राहत आहे. म्हणुन मौजे शहापुर येथील जमीन विक्री करुन मौजे कळपविहीर भागात जमीन घेण्याचे प्रयत्नात आहे. प्रतिवादी यांनी वा त्यांचे नोकर चाकर, मित्र, नातेवाईक, हस्त, एजन्ट वा प्रतिवादी मार्फत इतर कोणीही कोणत्याही प्रकारे दावा मिळकत हस्तांतरीत करु नये व वादीच्या कायदेशीर हक्कास बाधा पोहचू नये या करीता तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळावा अशी विनंती वादीने केली आहे. प्रतिवादी हे जमीन विकण्याच्या प्रयत्नात आहेत अशी भिती वादीला आहे. सकृतदर्शनी केस, तौलीक समतोलतत्व वादीचे बाजूने आहे, मनाई हुकुम न मिळाल्यास वादीचे अतोनात नुकसान

होईल. म्हणून सदरचा अर्ज केला आहे.

४. प्रतिवादी १ व २ यांनी नि. १९ वर त्यांचे लेखी म्हणणे दाखल करुन वाद मिळकतील वर्णन व नातेसंबंध मान्य करुन अर्जातील सर्व कथनाचा इन्कार केला आहे. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, वादी ही प्रतिवादी १ ची मुलगी व प्रतिवादी २ यांची बहीण आहे. गट क्र २३ व २० मधील जमीन ही वादी व प्रतिवादींची वंशपंरापरागत व वारसाहक्काची जमीन आहे. सदर जमीन ही नामदेव सहादु मापारी यांनी त्यांचे आई वडीलांकडून वंशपंरापरागत व वारसाहक्काने वाटणीपत्राव्दारे आलेली आहे. नामदेव मापारी हे आजाराने सन २००५ मध्ये मृत्यु पावले. मृत्युपुर्वी त्यांनी गट क्र २३ व २० ही सर्व जमीन मुलगा संजय नामदेव मापारी प्रतिवादी २ यांचे नावे मृत्युपत्र केले होते. त्यामुळे त्याची शासनदप्तरी सातबारामध्ये त्याची नोंद संजय नावाने निघू लागली. त्यानंतर कैलासची पत्नी उषा प्रतिवादी ३ हिने उपविभागीय पोलीस अधिकारी मेहकर यांचेकडे तक्रार करुन व गावातील पंच मार्फत गट क्र २३ व २० मध्ये हिस्यासाठी जमीन मागणीची तक्रार केली असता प्रतिवादी २ यांनी वाटणीपत्र कैलासचा मुलगा आकाश कैलास मापारी व संजय नामदेव मापारी यांच्यामध्ये वाटणीपत्रक केले होते. प्रतिवादीने पुढे असेही कबुल केले की, ते वादीचा १/४ हिस्सा न्यायालयामार्फत देण्यास तयार आहेत.

५ प्रतिवादी ३ ते ५ यांनी नि. २४ वर त्यांचे लेखी म्हणणे दाखल करुन वाद मिळकतील वर्णन व नातेसंबंध मान्य करुन अर्जातील सर्व कथनाचा इन्कार केला आहे. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, वादी ही प्रतिवादी १ ची मुलगी व प्रतिवादी २ ची बहीण आहे, प्रतिवादी ३ ची नणंद आहे व प्रतिवादी ४ व ५ ची आत्या आहे. वादीचे वडील नामदेव मापारी हयांनी त्यांचे हयातीमध्ये त्यांच्या जवळील सोने चांदी, गुरे ढोरे विक्री करुन वादीच्या भविष्याचा विचार करुन तिचे लग्न केले. मयत नामदेव मपारी यांनी त्यांच्या हयातीमध्ये वादीची व प्रतिवादी १ व २ यांची संमती घेवून व गावातील पंच साक्षीदार बोलावुन त्यांच्या नावे असलेली शेतजमीन त्यांचे हयातीत सन २००३ मध्ये प्रतिवादी २ च्या नावे वाटणी करुन दिली. त्यावेळी वादी हजर होती. तिने कोणताही आक्षेप घेतला नाही. वादीने स्वत: वाद मिळकतीची नोंद प्रतिवादी २ च्या नावे महसुल दप्तरी करुन ठेवलेल्या होत्या व आहे. सन २००४ मध्ये नामदेव मापारी हे मयत झाले.

तेव्हाच एकत्र कुटूंब समाप्त झाले व त्यांच्या मृत्युपुर्वीच प्रतिवादी ३ चे पती व प्रतिवादी ४ व ५ चे वडील प्रतिवादी २, वादीचा भाउ व प्रतिवादी १ चा मुलगा नामे कैलास मापारी हे सन २००० मध्ये मयत झाले आहे. तेव्हापासून दावा मिळकत ही प्रतिवादी २ व प्रतिवादी ३ ते ५ यांच्या मालकीची व ताब्यात आहे. प्रतिवादी २ ने त्याच्या पुतण्याला म्हणजे प्रतिवादी ४ ला त्याच्या हयातीमध्ये वाद मिळकत वाटणीव्दारे वाटणी करुन दिली. तेव्हापासून प्रतिवादी ४ हा दावा मालमत्तेचा मालक व कब्जेदार झालेला आहे.

६ प्रतिवादींनी पुढे असे कथन केले की, वादीने तिचे वडीलांच्या हयातीमध्ये जमीनीची वाटणी करुन मागायला पाहीजे होती. वादीच्या वडीलांनी प्रतिवादी २ च्या नावे जमीन वाटुन दिली होती तेव्हा अडी अडथळा निर्माण करुन जमीन वाटुन मागायला पाहीजे होता परंतु तिचा सदर जमीनीमध्ये कोणताही हितसंबंध नसतांना तिने वाटून मागीतले नाही. वादीचा जमीनीशी हितसंबंध येत नाही. प्रतिवादी २ ने प्रतिवादी ४ च्या नावे वाटणी करुन दिली आहे. त्यामुळे वादीला म्जवचचसम च्या तत्वाने बाहेर जाता येणार नाही. प्रतिवादी २ व ४ हे वादमिळकतीचे खरे मालक व वहितदार आहे. त्यांचा पूर्ण हक्क व अधिकार आहे. वरील सर्व कारणांमुळे वादीचा मनाई अर्ज खारीज करावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

७. खालील मुद्दे माझ्या निर्णयाकरिता उपस्थित झाले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी त्याखालील दिलेल्या कारणमिमांसेस अनुसरून देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | सकृतदर्शनी केस वादीच्या बाजुने आहे काय? | .. नकारार्थी |
| २) | सोईचा कल वादीच्या बाजूने आहे काय? | .. नकारार्थी |
| ३) | सदर अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे भविष्यात न भरुन निघणारे नुकसान होईल काय? | ...नकारार्थी |
| ४) | कोणता आदेश ? | ..अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दे क्र. १ ते ३:—</u>**

८. मुद्या क्र. १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्या कारणाने त्यांना एकत्र चर्चीले जाणे सोयीचे ठरेल. श्री ए.पी.काळे, वादीतर्फे वकील यांनी सांगितले की, वादमिळकतमध्ये वादीचा १/४ हिस्सा आहे. वादी व प्रतिवादी कायद्याप्रमाणे एकत्र कुटूंबातील सदस्य आहेत. दावा मिळकत वादी व प्रतिवादींची वडीलोपार्जित मालमत्ता आहे. वादीचे वडीलांना सदरची मिळकत त्यांचे आई वडीलांकडून वारसा हक्काने मिळालेली आहे. सुरुवातीला दावा मिळकत ही वादीचे वडील मयत नामदेव सहादु मापारी यांना वंशपरांपरागत पध्दतीने मिळालेली होती. त्यांच्या मृत्युनंतर प्रतिवादी २ व प्रतिवादी ४ हयांनी वाद मिळकत वादीचे हक्क डावलून आपसात वाटणी करुन घेवून तशी शासन दप्तरी नोंदी करुन घेतल्या म्हणून प्रतिवादींना वा त्यांचे नोकर चाकर, मित्र, नातेवाईक, हस्त, एजन्ट वा प्रतिवादी मार्फत इतर कोणीही कोणत्याही प्रकारे दावा मिळकत हस्तांतरीत करु नये व वादीच्या कायदेशीर हक्कास बाधा पोहचू नये. म्हणुन तात्पुरता मनाई अर्ज मंजुर व्हावा अशी विंनती श्री काळे वकील यांनी केली आहे.

९. श्री. आखाडे प्रतिवादी १ व २ तर्फे वकील यांनी नि.क्र.२५ अन्वये हमीपत्र दाखल केले की, ते दाव्याचा निकाल लागे पावेतो दावा मिळकतीस संबंधी कोणताही प्रकारचा विक्री, हस्तांतरणाचा व्यवहार, बोजा व्यवहार करणार नाहीत.

१०. श्री. व्ही.ए.वानखेडे, प्रतिवादी ३ ते ५ तर्फे वकील यांनी सांगितले की, वादीने तिचे वडीलांच्या हयातीमध्ये जमीनीची वाटणी करुन मागायला पाहीजे होती. वादीच्या वडीलांनी प्रतिवादी २ च्या नावे जमीन २२.१०.२००३ ला वाटुन दिली होती तेव्हा वादीने अडी अडथळा निर्माण करुन जमीन वाटुन मागायला पाहीजे होता परंतु तिचा सदर जमीनीमध्ये कोणताही हितसंबंध नसतांना तिने वाटून मागीतले नाही. तसेच ११. ३. २०१२ ला प्रतिवादी क्र. २ ने प्रतिवादी क्र. ४ नावे सदरहु जमिन करुन दिली. वादीचा जमीनीशी हितसंबंध येत नाही. प्रतिवादी २ व ४ हे वादमिळकतीचे खरे मालक व

वहितदार आहे. त्यांचा पूर्ण हक्क व अधिकार आहे. वरील सर्व कारणांमुळे वादीचा मनाई अर्ज खारीज करावा अशी विनंती श्री वानखेडे वकील यांनी केली आहे.

११. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी हे वाद मिळकत विकण्याचे तयारी आहे असे वादीने स्पष्ट कथन आहे. वादीने मनाई अर्जामध्ये दावा मिळकत गट नंबर २३ याचे एकुण क्षेत्र १ हे ५७ आर व त्यापैकी हिस्सा १/४ आर दर्शवले आहे. तसेच गट नंबर २० याचे एकुण क्षेत्र १ हे २१ आर व त्यापैकी हिस्सा १/४ आर दर्शवले आहे. या मिळकतींच्या अनुषंगाने वादी मनाई मागत आहे. दोन्ही पक्षाने आपसात असलेले नाते हे मान्य केले आहे तसेच दावा मिळकत ही वडीलोपार्जीत असल्याचे सुध्दा मान्य केले आहे. वादीने आपल्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, वादीच्या वडीलांच्या मृत्यूनंतर प्रतिवादी २ व प्रतिवादी क्र. ४ यांनी वादीचे हक्क डावलून वाद मिळकत ही आपसात वाटून घेतली आहे परंतु सदरहु वाटणी केव्हा झाली याबाबात वादीने काही नमुद केले नाही. याउलट प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचे असे म्हणणे आहे की, वादीच्या वडीलांनी त्यांच्या हयातीमध्येच सदरहु वाद मिळकतीची वाटणी करुन दिली होती. त्यावेळेस वादी तेथे हजर होती व तिने कोणताही आक्षेप घेतला नाही. पुढे त्यांनी असे म्हटले की, वादीच्या वडीलांच्या मृत्यूनंतर एकत्र कुटूंब हे सपुष्टात आले आहे व आता वादीचा वाद मिळकतीमध्ये कोणताही हक्क नाही. वादीने दाखल केलेल्या सातबाराच्या नमुन्यात सुध्दा प्रतिवादी २ व ४ च्या नावाने सदहु जमिन दर्शविली आहे.

१२. जरी वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी हे कधीही वाद मिळकत हस्तांतरीत करु शकतात व त्यामुळे वादीच्या हक्क संबंधांना तडा जाण्याची शक्यता नाकारता येत नाही परंतु वादीच्या म्हणण्यावरुन वाद मिळकत ही प्रतिवादी २ व ४ च्या दाब्यात पुर्वीपासून आहे व त्यांनी ती आपसात वाटून घेतली आहे हे वादीला माहित होते. परंतु तीने आजपर्यंत काही कारवाई केली नाही व आज रोजी अचानक तिला असे वाटते की, प्रतिवादी हे कधी काय करतील याचा नेम नाही. प्रतिवादी हे वाद मिळकत हस्तांतरीत करीत आहेत. याबाबत ठोस पुरावा किंवा कागदपत्रे दाखल केले नाहीत किंवा प्रतिवादी हे वाद मिळकत हस्तांतर करीत आहे किंवा करण्याच्या प्रयत्नात याबाबत सुध्दा काही स्पष्ट म्हटलेले नाही फकत त्यांना संशय आहे व त्यासाठी त्यांनी हा दावा आणलेला आहे. वादीचे लग्न हे १९८६ साली झाले तेव्हापासून ती तिच्या सासरी राहते वादीचे वडील

यांचा मृत्यू अंदाजे सन २००५ साली झाला व वाद मिळकत ही प्रतिवादीच्या ताब्यात आहे आतापर्यंत वादीने कधीही वाद मिळकती मध्ये हिस्सा मागीतला नाही पण अचानकपणे तिने हिससा मागितला व प्रतिवादींनी तो नाकारला हे पटत नाही. प्रतिवादी हे दावा मिळकत हस्तांतरीत करणार आहेत याबाबत नेमके काही वादीने सांगितले नाही फकत तिने संशयावरुन हा दावा दाखल केला आहे यावरुन असे स्पष्ट होते की, वादीने हा दावा स्वच्छ हाताने दाखल केला नाही.

१३. वादीचे असे म्हणणे आहे की, ती एकत्र अविभाजीत कुटूंबाची सदस्य आहे व तिचा वाद मिळकती मध्ये १/४ हिस्सा आहे. हे दाखविण्यासाठी तिने काही कागदपत्रे दाखल केले नाहीत आपण जर हिंन्दु वारसाहक्क कायद्यामधील २००५ ची दुरुस्ती व १९९४ महाराष्ट दुरुस्तीचा जरी विचार केला तर वादीचा वाद मिळकतीमध्ये हिस्सा आहेच असे गृहित धरता येणार नाही व जरी तिचा हिसा असला तरी तो किती हे अजून ठरवावयाचे आहे. तो हिस्सा पुरावा झाल्यावर अंतिम आदेशान्वयेच ठरविल्या जाणार आहे. प्रतिवादी क्र. ३ हिचे पती व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचे वडील हे मयत झालेले आहे हे प्रतिवादी शेती करुन त्यांचा उदरनिर्वाह करतात. अश्या परिस्थिती मध्ये जरी आपण असे गुहित धरले की वादीचे दावा मिळकती मध्ये कायदेशीर हिस्सा आहे व प्रतिवादी हे दावा मिळकत हस्तांतरीत करण्याच्या तयारीमध्ये आहे तरी त्यांना मनाई हुकुमव्दारे रोखल्यास त्यांच्यावर अन्याय होईल या उलट जरी प्रतिवादीनी वाद मिळकत विकली तरी वादीकडे दुसरे कायदेशीर पर्याय उपलब्ध आहेत.

१४ म्हणून मी वर चर्चिल्याप्रमाणे या निष्कर्षापर्यंत पोहचलो की, सकृतदर्शनिय केस ही वादीच्या बाजुने नाही व न्यायाचे समतोलत्व हे सुध्दा वादीच्या बाजुने नाही तसेच तात्पुरता मनाई हुकुम दिला तर प्रतिवादीचे न भरुन येणारे नुकसान होईल या उलट जर तात्पुरता मनाई हुकुम नाकारला तर वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही त्यामुळे मुदा क्र. १ ते ३ याचे उत्तर नकारर्थी देतो. व खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**१) अर्ज नामंजूर.**

**२) प्रस्तुत अर्जाचा खर्च अंतीम निकालाप्रमाणे राहील.**

स्वाक्षरी
(मंगेश न. जयस्वाल)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
मेहकर

मेहकर
दिनांक — २२.०९.२०१६

दाखला

मी प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की, मूळ हुकूम / निकालपत्राच्या

पीडीएफ फाईलमधील सर्व मजकूर हा मूळ हुकूम / निकालपत्राप्रमाणे बरोबर आहे

| | |
|---|---|
| कनिष्ठ लिपीक नाव | : गजानन रघुनाथ हेलकर |
| न्यायालय | : दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मेहकर |
| दिनांक | : २२.०९.२०१६ |
| हूकूम / निकालपत्रावर न्यायिक अधिकारी यांची सही दिनांक | : २२.०९.२०१६ |
| हूकुम / निकालपत्र अपलोड केल्याचा दिनांक | : २९.०९.२०१६ |

स्वाक्षरी
(मंगेश न. जयस्वाल)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
मेहकर

दिनांक — २९.०९.२०१६